REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अथ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख ५ एप्रिल, १९५० अंक १४

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगोर, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. — श्री. वा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी ५१५ बुधवार

अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१६,८१५ |
| खेळतें भांडवल | रु. ७१,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्रा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**जर्मनीचा बोलपटाचा धंदा**—प. जर्मनीच्या पार्लमेंटनें जर्मनीचा बोलपटाचा धंदा पुन्हां आपल्या पायावर उभा करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ४,५५,००,००० रुपये रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. युद्धापूर्वी जर्मनीचे बोलपट तांत्रिक दृष्ट्या जितके उच्च दर्जाचे होते तसेच पुन्हां काढण्याचा सरकारचा विचार आहे.

**ऑस्ट्रेलिआंतील आइस्क्रीमचा खप**—ऑस्ट्रेलिआंतील प्रत्येक नागरिक दरवर्षी सरासरी १॥ गॅलनपेक्षां अधिक आइस्क्रीम खातो असा अंदाज एका तद्देशीय कारखानदारांच्या संस्थेनें केला आहे.

**रेशमासाठीं संशोधन शाळा**—सिल्क रिसर्च असोसिएशन ह्या संस्थेनें मुंबईला रेशीम विषयक संशोधन करण्यासाठीं एक प्रयोगशाळा काढण्याचें ठरविलें आहे. शाळेसाठीं २० लाखांची रक्कम राखून ठेवण्यांत आली आहे. मुंबई सरकारनें इमारतीसाठीं कुलाब्याला जागा देण्याचें वचन दिलें आहे. जागेचें भाडें नाममात्र घेण्यांत येणार आहे.

**पडीक जमिनींची लागवड**—१९५०-५१ सालीं आसाम सरकार १५,००० एकर पडीक जमीन नव्यानें लागवडीस आणणार आहे. ही अपेक्षा परिपूर्ण झाल्यास १०,००० टन अधिक अन्नधान्य निर्माण होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**तामीळ भाषेंतील ज्ञानकोश**—तामीळ भाषेंत ज्ञानकोश संपादन करण्यासाठीं १५ लाख रुपयांची गरज आहे. आतापर्यंत अवघे १,४६,००० रुपये जमा झाले आहेत. भारतीय सरकारकडून मिळावयाची वार्षिक ७५,००० रुपयांची मदत चालू सालीं मिळणार नाहीं, असें कोशाच्या संपादक मंडळाला कळविण्यांत आलें आहे. आतां सार्वजनिक फंड उभारण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

**राजस्थानसाठीं पाटबंधारे**—राजस्थान सरकारनें येत्या दोन वर्षांत पाटबंधाऱ्यांसाठीं ५ कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. पुढील फडणीशी वर्षांत १ कोटी रुपये खर्चून २०० छोटीं छोटीं पाणी पुरवठ्याचीं कामें सरकार पूर्ण करणार आहे. राजस्थानांत दोन नवीन शेतकी शाळा आणि एक शेतकी कॉलेजही उघडण्यांत येणार आहे.

**ब्रिटनची रशिआकडे तक्रार**—मास्कोंतील परदेशीय वकिलांतील लोकांना आपल्या चलनाच्या बदला रूबलचें चलन इतरांपेक्षा जास्त दरानें मिळत असे. ह्या सवलतीचा दर रशिअन सरकारनें रद्द केल्याबद्दल ब्रिटननें रशिआकडे तक्रार केली आहे. रशिअन सरकारच्या ह्या निर्णयामुळें मास्कोंतील परदेशीय वकिलातींचे खर्च वाढणार आहेत.

**वृत्तपत्रांचा कागद**—चालू वर्षाच्या उरलेल्या महिन्यांत नॉर्वेकडून १२,००० टन वृत्तपत्रांचा कागद मिळूं शकेल असें समजतें. ज्यांना कागदाची जरूर असेल त्यांनीं नेहमीप्रमाणें आयात परवाने घेऊन नॉर्वेच्या व्यापाऱ्यांकडे चौकशी करावी असें भारत सरकारनें जाहीर केलें आहे.

### लोकल डिलिव्हरीचीं पाकिटें व कार्डें

पाकिटें प्रत्येक तोळयास १ आणा

सिंगल पोस्टकार्ड ६ पै

रिप्लाय पोस्टकार्ड १ आ.

परत्याच्या बाजूवर डाव्या वरच्या कोपऱ्यांत 'लोकल' असें स्पष्ट लिहावें. जेथें लोकल टपालासाठीं खास हिरव्या पेट्या असतील, तेथें त्या पेट्यांत टपाल टाकावें. इतर ठिकाणीं हीं कार्डें व पाकिटें पोस्ट ऑफिसांतील पेटींतच टाकावीं. अनपेड लोकल पत्रांवर इतर पाकिटांप्रमाणेंच जादा दर आकारला जाईल. परंतु विनतिकिटाचीं किंवा अपुऱ्या तिकिटांचीं पोस्टकार्डें नष्ट करण्यांत येतील. लोकल डिलिव्हरी क्षेत्रांत पाकिटें व कार्डें रीडायरेक्ट करतां येतील; बाहेर तीं रीडायरेक्ट करून धाडतां येणार नाहींत. लोकल पत्र किंवा पाकीट आगगाडींतील टपाल पेटींत किंवा आर. एम. एस. मेलव्हॅनमध्यें टाकतां येणार नाहीं.


## बँक ऑफ पूना लिमिटेड,

पुणें शहर

विशेष साधारण सभेची नोटीस.

नोटीस देण्यांत येतें कीं, बँकेच्या भागीदारांची विशेष साधारण सभा शनिवार दिनांक १५ एप्रिल १९५० रोजीं सायंकाळीं ५ वाजतां, (स्टँ. टा.) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, ४५५ रविवार पेठ, पुणें शहर या ठिकाणीं, बँकिंग कंपनीज ॲक्ट १९४९ प्रमाणें, बँकेचे आर्टिकल्समध्यें जरूर तो फेरफार करणें संबंधींचा ठराव करणेंसाठीं भरेल. सदर ठरावाची नक्कल सभासदांकडे रवाना झालेली आहेच. कळावें.

पुणें शहर. दि. १५-३-५० — बोर्डाचे हुकुमावरून, गो. गं. साठे. मॅनेजर.

## नोटीस

बँक ऑफ पूना लिमिटेड.

पुणें शहर.

नोटीस देण्यांत येतें कीं बँकेच्या भागीदारांची चतुर्थ वार्षिक साधारण सभा शनिवार दिनांक १५ एप्रिल १९५० रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां, (स्टँडर्ड टाइम) बँकेचे रजिस्टर्ड ऑफिस, ४५५ रविवार पेठ, पुणें शहर, ह्या ठिकाणीं खालील कामासाठीं भरेल.

(१) बँकेचा दि. ३१ डिसेंबर १९४९ अखेरचा ताळेबंद, नफा तोटा पत्रक, आणि डायरेक्टर बोर्डाचा, व ऑडिटर्सचा रिपोर्ट यांचा विचार करणें.

(२) निवृत्त होणाऱ्या परंतु फेर निवडणुकीस पात्र असलेल्या दोन डायरेक्टरांची निवडणूक करणें.

(३) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

(४) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

पुणें शहर. दि. २३-२-५० — बोर्डाचे हुकुमावरून, गो. गं. साठे. मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ५ एप्रिल, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कर चुकविणारांचे गर्हणीय प्रकार

भारत सरकारनें नेमलेल्या प्राप्ती—कर—चौकशी समितीच्या १९४९ च्या कामाचा अहवाल तयार झाला आहे. कमिशनपुढें एकूण १,३६५ प्रकरण चौकशीसाठीं होतीं. त्यापैकीं १०१ प्रकरणांसंबंधीं कमिशननें सरकारकडे माहिती सादर केली आहे. हीं एवढींच प्रकरणें लक्षांत घेतलीं तरीसुद्धा सुमारें २,८८,०६,५०७ रुपये प्राप्तीवरील कर चुकविण्यांत आला आहे, असें आढळून आलें आहे. कमिशननें अजून बड्या प्रकरणांना हात घातलेला नाहीं; तरी पण कर चुकविणारे काय काय युक्त्या—प्रयुक्त्या योजतात ह्याचा नमुना झालेल्या चौकशीवरूनही लक्षांत येतो.

कमिशननें आपल्या अहवालांत कर चुकविण्याच्या व नफा लपविण्याच्या पद्धतींची त्रोटक माहिती दिलेली आहे. कापडाच्या गिरण्यांच्या मॅनेजिंग एजंटांनीं अनेक प्रकारांनीं गुप्त नफा मिळविलेला आहे. सरकारचें उत्पन्न आणि भागीदारांचें हित ह्या दोन्हीं दृष्टींनीं हे प्रकार हानिकारक होते. जो कच्चा माल कधींच घेतला नाहीं तो खरेदल्याचें दाखवून उत्पादनाची किंमत अधिक दाखविणें अथवा मॅनेजिंग एजंटांच्याच परंतु निराळ्या नांवानें व्यवहार करणाऱ्या कंपन्यांकडून कच्चा माल खरेदी करणें, अशा प्रकारच्या मार्गांचा अवलंब करण्यांत आलेला आहे. एका डॉक्टरचें उदाहरण तर फारच मासलेवाईक आहे. ह्या डॉक्टरला सरकारकडून साखर आणि क्विनिन पुरविण्यांत येत होतें. त्यांचा उपयोग करून लष्कराला ग्लूकोज आणि क्विनिन ॲमप्यूल्स डॉक्टरानें पुरवावयाच्या होत्या. तथापि डॉक्टरसाहेबांनीं क्विनिन ऐवजीं खडूची पूडच वापरली आणि ग्लुकोज ऐवजीं कसला तरी निकृष्ट दर्जाचा गोड पदार्थ पुरविला. ह्या फसवेगिरीचा सुगावा कमिशनला लागताच हिशेबाचीं गुप्त पुस्तकें जप्त करण्यांत आलीं. ह्या सर्व व्यवहारांत ६० लाख रुपयांचें भांडवल गुंतविण्यांत आलें होतें. हे डॉक्टर एकाएकीं कालवश झाले; परंतु त्यांच्या वारसांनीं सर्व प्रकार कबूल केला व कर भरण्याचें मान्य केलें.

कमिशनच्या चौकशींत येत असलेल्या अडचणी एका गोष्टीनें वाढल्या. कर चुकविणाऱ्या बहुतेक लोकांचे व्यवहार आणि बँकांतील खातीं देशाच्या निरनिराळ्या भागांवर पसरलेलीं होतीं. त्याचप्रमाणें त्यांची मालमत्ताही अशीच विखुरलेली होती. हिंदुस्थानांतील संस्थानांच्या अस्तित्वामुळें सरकारचें उत्पन्न बुडण्यास साह्य झालें. कारण, काळ्या बाजारांत मिळविलेला पैसा संस्थानांत पाठवून सुरक्षित राखला जात असे. कमिशनला आपल्या चौकशीची व्याप्ति संस्थानांपर्यंत वाढविता येण्यासारखी नव्हती. त्यामुळें युद्धकाळांत गुप्त रीतीनें मिळविलेला पैसा संस्थानांच्या आश्रयास गेला व त्याचा शोध लावणें अशक्य झालें. कमिशननें संस्थानांतील बँकांकडे माहिती पुरविण्याच्या मागण्या केल्या असून आतांपर्यंत ३४० प्रकरणांबाबत बँकांकडून उत्तरें आलीं आहेत. अशा प्रकारची माहिती प्राप्ती—कर खात्यानें कधींच जमा केलेली नव्हती. आतां ह्या माहितीचा उपयोग कमिशनपुढील प्रकरणांबाबत होईलच; ह्याशिवाय ह्या खात्याच्या मामुली कामालाही बराच उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

निरनिराळ्या प्रांतांतील श्रीमंत कर-चुकारांनीं आपल्या जवळील पैसा संस्थानांच्या कर्जांत गुंतविलेला आढळून आला आहे. अशा रीतीनें गुंतविलेला पैसा सरकारच्या नजरेस येणार नाहीं असें त्यांना वाटत होतें. संस्थानांच्या कर्जरोख्यांत जी रक्कम गुंतविण्यांत आली होती त्यासंबंधीं माहिती आतां कमिशनकडे आली आहे. कच्च्या व पक्क्या मालाची वहातूक कशी करण्यांत आली ह्यासंबंधीं रेल्वेच्या कागदपत्रांच्या आधारें कमिशन माहिती गोळा करीत आहे. ह्या माहितीच्या आधारानेंही काळ्या बाजारांतील व्यवहारांवर पुष्कळ प्रकाश पडेल असा अंदाज आहे.

## बँकांच्या नियमावलींत दुरुस्त्या

नवीन बँकिंग कायदा आतां बँकिंग कंपन्यांस लागू झाला आहे. ह्या कायद्यास अनुसरून बँकांनीं आपले मेमोरँडम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन बदलून घेणें आवश्यक झालें आहे. त्याबाबत रिझर्व्ह बँकेनें एक सर्क्युलर काढून सर्व बँकांना सूचनाहि पण केली आहे. बँकिंग कंपन्यांच्या नव्या कायद्यानें बँकांवर अनेक प्रकारचीं बंधनें घातलीं आहेत, त्यांच्या कार्यक्षेत्राची आखणी केली आहे, मताधिकार निश्चित केले आहेत आणि पैशाच्या गुंतवणुकीचेहि नियम घालून दिले आहेत. सर्व बँकांचा व्यवहार आतां एकाच प्रकारच्या चाकोरींतून चालणार आहे. केवळ बँकिंग कायद्यानें कांहीं प्रकारचे व्यवहारांस बंदी केली आहे, म्हणून बँकांच्या मेमोरँडममधील त्यासंबंधांतील मूळ व्यापक उद्देश असणारीं कलमें बेकायदा होतात, हें म्हणणें कितपत न्याय्य होईल ह्याविषयीं शंका व्यक्त करण्यांत येत आहे. गेल्या युद्धाच्या प्रारंभापासून निरनिराळ्या कायद्यांनीं कित्येक प्रकारचे व्यवहार बेकायदा ठरविले, परंतु कितीतरी कंपन्यांच्या मेमोरँडममध्यें हे बेकायदा व्यवहार करण्याचे उद्देश अद्याप नमूद आहेतच. केवळ ह्या कलमांमुळें कायद्याचा भंग होतो असें अजून कोणी म्हटलेलें नाहीं; त्याचप्रमाणें कोणत्याहि कंपनीस आपला मेमोरँडम बदलावा लागलेला नाहीं. तेव्हां, बँकिंग कंपनीज कायद्यांतील ६ व्या कलमानें कांहीं व्यवहारांस जी बंदी घातली तिचें स्वरूप इतर कायद्यांनीं घातलेल्या बंदीपेक्षा वेगळें खास नाहीं. ह्या कलमांत समाविष्ट असलेल्या निषिद्ध बाबी बँकेच्या मेमोरँडममध्यें आहेत म्हणून तिनें तो दुरुस्त केलाच पाहिजे, असा आग्रह धरण्याचें प्रयोजन नाहीं, असा इंडियन बँक्स असोसिएशनला मिळालेला कायदेशीर सल्ला सांगतो.

कित्येक बँकांच्या मेमोरँडममध्यें व आर्टिकल्समध्यें त्यांना त्यांचें भाग भांडवल वेगवेगळ्या प्रकारच्या भागांत वाटण्याचा अधिकार दिलेला आहे. बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या १२ व्या कलमाप्रमाणें बँकांचें भांडवल फक्त ऑर्डिनरी शेअर्सचेंच असलें पाहिजे. १ जुलै १९४४ पूर्वीच्या प्रेफरन्स भागांसहि परवानगी आहे. ज्या बँकांचें आज फक्त ऑर्डिनरी भांडवल आहे, त्यांना त्यांच्या मेमोरँडममध्यें दिलेला हा अधिकार कृतींत उतरवितां येणार नाहीं. म्हणून १२ व्या कलमानें तो बेकायदा मात्र होत

नाहीं, असाहि कायदेशीर सल्ला मिळाला आहे. बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या १० व्या कलमासहि हीच गोष्ट लागू आहे. बँकिंग कंपनीज कायद्यानें ज्या दुरुस्त्या वास्तविक आवश्यक ठरलेल्या नाहींत व ज्या दुरुस्त्या न केल्यानें व्यवहारांत कांहीं अडचण येणार नाहीं, त्या करण्यास बँकांवर सक्ति कां व्हावी ? कायद्यानें घातलेलीं बंधनें बँकांना आतां पूर्ण परिचयाचीं आहेत; मेमोरँडम किंवा आर्टिकल्स ह्यांतील मूळ कलमांमुळें त्यांची दिशाभूल होण्याचा संभव नाहीं. कंपनी कायद्याच्या १२ व्या कलमाप्रमाणें मेमोरँडम बदलण्यास कोर्टाची मंजुरी घ्यावी लागते, त्यासहि निष्कारण खर्च पडेल, असें कित्येक बँकांचें म्हणणें आहे. बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या कांहीं कलमांच्या अर्थाबद्दलच दुमत आहे. अशा कलमांचा खरा अर्थ हायकोर्टाच्या निवाड्यानें स्पष्ट होईल तेव्हां होवो. परंतु त्यापूर्वी बँकांनीं आपले नियम बदलून घेऊन आपले अधिकार निष्कारण कां कमी करावेत ? बँकिंग कंपनीज ॲक्ट वेळोवेळ बदलत जाईल, त्याप्रमाणें प्रत्येक बँकेनें मेमोरँडम बदलत जावयाचें किंवा काय ? हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे.

बँकांचे मेमोरँडम व आर्टिकल्स बदलण्याची सक्ति कां नसावी ह्याविषयीं वरीलप्रमाणें बाजू मांडता येईल. तथापि अशी दुरुस्ती आवश्यक आहे असें मानलें, तर रिझर्व्ह बँकेनेंच मेमोरँडम व आर्टिकल्स ह्यांचे नमुने तयार करून ते स्वीकारण्यास बँकांना सांगितलें असतें तर फार सोईचें झालें असतें. प्रत्येक बँकिंग कंपनीस ह्या नमुन्यांत थोडा फार फरक करता आला. कंपनी कायद्यांतील "टेबल ए" नें ज्या प्रकारानें आर्टिकल्स तयार करून दिलीं आहेत, त्याच धर्तीवर बँकिंग कंपन्यांच्या कायद्यास परिशिष्ट जोडता आलें असतें किंवा रिझर्व्ह बँक असे नमुने बँकांच्या सोईसाठी तयार करून पुरवूं शकली असती. परंतु तसें कांहींच करण्यांत न आल्याकारणानें भारतांतील प्रत्येक बँकेस स्वतंत्रपणें हा खटाटोप करावा लागणार आहे आणि त्याप्रीत्यर्थ "तज्ज्ञांना" लाखो रुपये द्यावे लागतील. शिवाय, हें काम पूर्णपणें समाधानकारक होईलच, अशी खात्री नाहीं; तज्ज्ञांवरच अवलंबून रहावें लागणार, हें उघड आहे.

सरकार व रिझर्व्ह बँक ह्यांनीं केलेली चूक कांहीं अंशीं दुरुस्त करता येण्याजोगी आहे. कांहीं महिन्यांपूर्वी पुणें येथें डेक्कन बँक्स असोसिएशन नांवाची एक संघटना निर्माण करण्यांत आली आहे. ह्या असोसिएशननें आपल्या सभासदांच्यासाठी मेमोरँडम व आर्टिकल्स तयार करवून घेतलीं तर प्रत्येकास त्याच्या गरजेप्रमाणें थोडे फार फरक करून बराच त्रास व पैसा ह्यांची बचत करता येईल. नमुन्याचीं हीं पत्रकें असोसिएशननें सर्व सभासद–बँकांस वाटावी. अशा रीतीनें, एक भरीव काम होऊन सभासद–बँकांची फार मोठी सेवा होईल. तिनें ह्या संधीचा उपयोग करून, आपली उपयुक्तता पटवून द्यावी, म्हणजे तिच्या पुढील कार्याचा उत्कृष्ट पाया घातला जाईल. बँकांचे म्हणजे जनतेचेहि हजारो रुपये वांचतील व सहकार्याचा चांगला धडा घातला गेल्यासारखें होईल.

---

त्रावणकोर संस्थानांत 'मोनोझाइट'चा कारखाना— त्रावणकोर संस्थानांत 'मोनोझाइट' पासून 'थोरिअम' बनवण्याचा कारखाना येत्या सहा महिन्यांच्या आंत उभारला जाईल असें समजतें. कारखान्यांतील भांडवल ४५ टक्के त्रावणकोर-कोचीन संघराज्य आणि ५५ टक्के भारत सरकार पुरविणार आहे. 'थोरिअम' शिवाय 'मोनोझाइट' पासून उत्पन्न होऊं शकणारे इतर पदार्थही कारखान्यांत तयार होतील.

# रॉकफेलर फौंडेशनचें प्रचंड कार्य

## दातृत्वाचा जनतेच्या उद्धाराकडे प्रभावी विनियोग

(सह्याद्रि, एप्रिल १९५० मधील श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या लेखाचा प्रथमार्ध)

२३ मे, १९३७ रोजीं रॉकफेलर फौंडेशनचे निर्माते, जॉन डेव्हिसन रॉकफेलर हे आपल्या वयाच्या ९८ व्या वर्षी आर्मंड बीच, फ्लॉरिडा अमेरिका, येथें मृत्यु पावले. त्यांनीं सार्वजनिक कार्यासाठी एकण ५३ कोटी डॉलर दिले. रॉकफेलर इन्स्टिट्यूट फॉर मेडिकल रिसर्च, जनरल एज्युकेशन बोर्ड, रॉकफेलर फौंडेशन आणि दि लॉरा स्पेलमन रॉकफेलर मेमोरियल, अशा चार फंडांच्या स्थापनेसाठी रॉकफेलरनीं ४४ कोटी, ६० लक्ष डॉलर दिले. शैक्षणिक, धार्मिक व धर्मादाय कार्यासाठी त्यांनीं आणखी ८ कोटी, ४० लक्ष डॉलर दिले, ते वेगळे. वरील चार फंडांची जिंदगी आतां पुष्कळच वाढली आहे.

### व्यापक उद्देश

पूर्ण विचाराचे अंतीं आणि योजना आखूनच देणग्या देण्याची रॉकफेलर ह्यांची पद्धति होती. पहिली गोष्ट म्हणजे, भवितव्यावर त्यांचा विश्वास होता; चालू पिढीपुरतीच त्यांची दृष्टि मर्यादित नव्हती. आज जें महत्त्वाचें वाटतें तें पुढेंहि महत्त्वाचें राहीलच, अशी त्यांची कधींच कल्पना नव्हती. सहाजिकच, कांहीं विशिष्ट उद्देशांनीं फंडांना बांधून टाकणें त्यांना पसंत नव्हतें. "मोठ्या जिंदगीचें क्षेत्र संकुचित आणि न बदलता येण्याजोग्या उद्देशांनीं मर्यादित करणें राष्ट्रहिताचें होत नाहीं" ह्या सर आर्थर हॉबहाऊस ह्यांच्या मताशीं रॉकफेलर सहमत होते. रॉकफेलर फौंडेशनच्या उद्देश पत्रकांत एकच उद्देश–"जगांतील सर्व ठिकाणच्या जनतेची स्थिति सुधारणें"–नमूद केलेला आहे. १९२० सालीं रॉकफेलर ह्यांनीं जनरल एज्युकेशन बोर्डाच्या ट्रस्टींना एक पत्र लिहिलें. त्यांतील खालील उताऱ्यावरून रॉकफेलर ह्यांच्या विशाल दृष्टिकोनाची कल्पना येते:—"ह्यापूर्वी मी तुम्हांस दिलेल्या देणग्यांना त्यांच्या विनियोगाबाबत कोणतींहि बंधनें किंवा अटी असतील, तर त्या मी सर्व रद्द करीत आहे."

निर्माण केलेले फंड यावच्चन्द्रदिवाकरौ कायम टिकविण्याचा प्रयत्न करणें रॉकफेलर ह्यांस श्रेयस्कर वाटलें नाहीं. रॉकफेलर फौंडेशन आणि जनरल एज्युकेशन बोर्ड ह्या दोन्हींसहि त्यांचें स्थायी भांडवल व चालू उत्पन्न हीं दोन्हीं खर्चण्याचा पूर्ण अधिकार त्यांनीं देऊन ठेवलेला आहे, आणि त्याप्रमाणें त्यांनीं खर्च केलेलाहि आहे. रॉकफेलरच्या फंडांपैकीं कांहींचें कार्य भांडवल संपल्यामुळें संपुष्टांत आलेलें आहे. रॉकफेलर फौंडेशन किती वर्षे चालेल, हें त्यास उपयुक्त खर्चास मिळणाऱ्या वावावर अवलंबून आहे.

रॉकफेलर ह्यांच्या ह्या मतांची त्यांनीं स्थापन केलेल्या संस्थांचें कार्यावर छाप बसणें स्वाभाविकच आहे. आजच्या परिस्थितीवरूनच आगामी परिस्थितीची कल्पना करून बहुतेक विश्वस्तनिधींची व्यवस्था केलेली असते. परंतु, आज आवश्यक वाटणारी बाब कालांतरानें महत्त्वाची उरेल कशावरून ? पूर्वीच्या पिढ्यांतील लोकांचें अंदाज चुकल्यामुळें त्यांनीं केलेल्या फंडांची उपयुक्तता कमी झालेली आहे, असें कांहीं बाबतींत आढळतें. त्यांच्यापेक्षां आपले अंदाज अधिक अचुक ठरतील किंवा आपण त्यांच्यापेक्षा ज्यास्त दूरदृष्टीचें आहों, असें आपण कोणत्या आधारावर आणि कसें मानूं शकूं ?

## कै. प्रो. वा. गो. काळे यांच्या संबंधीच्या कांहीं ठळक आठवणी

लेखकः–श्री. ना. वा. पांडव, बी. ए.

( १० एप्रिल, हा प्रो. काळे ह्यांचा जन्मदिन. त्यानिमित्तानें श्री. नारायणराव पांडव ह्यांनीं लिहून पाठविलेल्या ह्या आठवणी प्रसिद्ध करण्यास आनंद वाटत आहे. —संपादक )

१ कै. प्रो. वा. गो. काळे हे पुणें सेंट्रल को. बँकेच्या स्थापनेसाठी मे. रजिस्ट्रार सो. यांचेकडे जो प्राथमिक अर्ज एकूण १९ इसमांच्या सह्यानिशी दाखल झाला, त्यावर पहिली सही दाखल करणारे सहकारी कार्यकर्ते होत. येणें प्रमाणें ह्या बँकेच्या व्यवहाराशीं त्यांचा अगदीं प्रारंभापासूनच संबंध येऊन व त्यानंतर सन १९३०–३१ ते सन १९३५–३६ अशी एकंदर ६ वर्षें त्यांनीं बँकेचे बोर्डावर डायरेक्टर म्हणून बँकेच्या कामकाजास मार्गदर्शन केलें व सन १९३२–३३ व १९३३–३४ हीं दोन वर्षें तर ते बँकेच्या बोर्ड ऑफ् डायरेक्टर मंडळाचे चेअरमन होते.

२ कै. दादासो. काळे हे आपल्या बँकेचे डायरेक्टर असतानांच मुंबई प्रॉ. को. बँक लि. या मध्यवर्ती सहकारी बँकेवर महाराष्ट्र विभागांतील जिल्हा मध्यवर्ती बँकांतर्फे त्यांची निवड झाली व त्यांचे हयाती असेपर्यंत ते मुंबई प्रॉ. को. बँक लि. चे डायरेक्टर बोर्डावर होते.

३ मुंबई प्रॉ. को. इन्स्टिट्यूट या मध्यवर्ती सहकारी संस्थेचे व्हा. चेअरमन म्हणूनहि ( ते आपल्या बँकेचे डायरेक्टर असतानांच प्रो. एच. एल. काजी यांचे विरुद्ध निवडणुकीस उभे राहून प्रचंड बहुमतानें निवडून येऊन ) त्यांच्याकडे त्या संस्थेच्या कामाचें धुरीणत्व सुमारें ४।५ वर्षें होतें.

४ कै. दादासो हे आपले बँकेचे डायरेक्टर असतांना १-१-३५ पासून त्यांनीं आपल्या स्वतःच्या संपादकत्त्वाखालीं "अर्थ" हें आर्थिक बातम्यांचा परामर्श घेणारे साप्ताहिक सुरू केलें. आतां त्यांचे चिरंजीव श्री. श्रीपादराव काळे हे आपल्या संपादकत्त्वाखालीं सदर साप्ताहिक चालवीत आहेत.

५ कै. दादासो हे बँकेचे चेअरमन असतांना बँकेची शाखा सासवड येथें पुरंदर तालुक्यांतील सोसायट्यांसाठी उघडण्यांत आली. पुरंदर तालुका शाखा कमेटीचे चेअरमन म्हणूनही त्यांचीच नियुक्ती झाली. शाखा कमेटीचे चेअरमन् असतानां या तालुक्यांतील सोसायट्यांच्या व्यक्तिगत व्यवहारांतही ते आस्थापूर्वक लक्ष घालीत असत.

६ कै. दादासाहेब हे बँकेचे चेअरमन असतांना सहकारी खात्याचे हिशेब तपासनीस यांनी बँकेस 'ब' वर्ग दिला. अर्थात, सरकारी हिशेब तपासनीस यांचें हें कृत्य कै. दादासाहेब यांना सहन झालें नाहीं. त्यांनीं सरकारी हिशेब तपासनीस यांच्या तपासणी यादीस चोख उत्तरें देऊन त्यांनीं काढलेल्या उणीवांचे बाबत शक्य ती व्यवस्था करून त्या बाबत सहकारी खात्याचे रजिस्ट्रार यांची खात्री पटवून देऊन अगदी अल्पावधींत म्हणजे सुमारें १५ ते २० दिवसांत बँकेचा पूर्वीचा म्हणजे 'अ' वर्ग मिळविला. मे. रजिस्ट्रार साहेब ह्यांनीं प्रो. काळे ह्यांच्या घरीं समक्ष जाऊन, "अ" वर्ग दिल्याचा खलोटा त्यांचे हातीं स्वाधीन केला, ह्यावरून त्यांचें सहकारी खात्यावरील वजन किती होतें, हें दिसून येईल.

७ सहकारी खात्यांतील एक पेन्शनर अंमलदार हे पेन्शन घेतल्यानंतरही सहकारी खात्याचे नॉमिनी म्हणून कांहीं सो. चे पंचकमेटीवर खात्यातर्फे नेमणूक करवून घेऊन काम करीत असत व सो. च्या पंचकमेटींतील इतर मंडळींपेक्षां ते जास्त शिक्षित व अनुभवी म्हणून त्यांना त्या त्या सो. कडून चेअरमन म्हणूनही नेमलें जाई. पुरंदर भागांतील अशा ३।४ सो. चे ते चेअरमन होते. पुढे या भागांतील सो. च्या मदतीनें तें आपल्या बँकचे डायरेक्टर बोर्डावर पुरंदर ता. सोसायट्यांतर्फे निवडून आले. तेव्हां सहाजिकच त्यांची सासवड बँक कमेटीवर सभासद म्हणून नेमणूक झाली. या शाखा कमेटीच्या सभेच्या वेळीं पुरंदर ता. एकंदर सो. च्या कामकाजाबाबत चर्चा होऊन ज्या सो. चे व्यवहारांत शिथिलता आहे व पोट नियमानुसार ज्यांचे व्यवहार चालत नाहींत अशा सो. बद्दल रिपोर्ट देण्यास प्रो. काळेसो. यांनीं सासवड एजंट यांना सांगितलें. पुढील सभेंत हा रिपोर्ट दाखल होऊन तो भर सभेंत मे. एजंट यांनीं वाचून दाखवावा असें कै. दादासो यांनी सुचविलें. सदर रिपोर्टांत सहकारी खात्याचे पेन्शनर नॉमिनी ह्यांचे देखरेखीखालील सो. चे कामकाजांतच जास्त शिथिलता व नियमबाह्य वागणूक आहे असें स्पष्टपणें नमूद केलें होतें. रिपोर्टाचे शाखा कमिटीचे सभेंत वाचन चालू असतांना कै. दादासो हे फारच अंतावलयाचे दिसत होते. कसेबसें रिपोर्ट वाचन पुरे झालें. तें होतांच कै. दादासो यांनीं सदर पेन्शनर सरकारी अंमलदार व या सो. चे पंच कमिटीवरील सहकारी खात्याचे नॉमिनी यांची भर सभेंत प्रत्यक्ष त्यांचे तोंडावर इतकी निर्भीडपणें हजेरी घेतली कीं, पुन्हां कधीं हे सद्गृहस्थ शाखा कमेटीचे सभेस हजर राहिले नाहींत. पुढें बोर्डावर निवडून येणेंसाठीही उभे राहिले नाहींत. त्यांचे कारकिर्दीतील ती एक अविस्मरणीय अशी गोष्ट घडली असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

( ८ ) मुंबई सरकारनें सन १९२९ सालीं मुंबई प्रांतापुरती बँकिंग चौकशी कमिटी मे. जे. ए. मदन यांच्या अध्यक्षतेखालीं नेमली होती. कै. दादासाहेब काळे यांची या कमेटीवर नेमणूक झाली होती, मात्र यावेळीं ते बँकच्या बोर्डावर आलेले नव्हते. ही कमेटी ठिकठिकाणचें चौकशीचें काम करीत खेड येथील बँकेच्या शाखेला भेट देऊन तेथील बँकिंगबाबत चौकशी करून माहिती घेण्यासाठी आली. मे. कमेटीच्या इतर सर्व सभासदांपेक्षां प्रो. दादासाहेब काळे यांनी माहिती काढून घेण्याचे दृष्टीनें सर्वांत जास्त परंतु अगदीं साध्या स्वरूपाचे प्रश्न विचारले. त्यावरून खेडेगांवी बँकिंग क्षेत्रांत सहकारी बँकेच्या शाखा व सहकारी सोसायट्या यांचे मार्फतीनेंच भरीव कामगिरी होणें शक्य आहे अशी त्यांची स्पष्ट कल्पना होती हें स्पष्टपणें प्रगट झालें.

( ९ ) कै. दादासाहेब काळे हे बँकेचे डायरेक्टर असतांना बँकेच्या नोकरवर्गाचें एक संमेलन ( बँकेच्या तळघरांत ) भरलें होते. श्री. दा. वि. गोखले हे त्या संमेलनाच्या सभेचे अध्यक्ष होते. बँकेची डायरेक्टर मंडळी व नोकरवर्ग यांचे संबंध त्यावेळीं बरेचसे दूरदूर अंतरावरचेच होते. डायरेक्टरांचें नातें वरिष्ठ कां रहावें ( कारण संस्थेचे नोकर हेच खरे तिचे निष्ठावंत कार्यकर्ते होत ) असा थोडासा वादग्रस्त प्रश्न कोठूनतरी चर्चेस निघाला. चर्चेचा उपन्यास करतांना कै. दादासाहेब काळे यांनीं खालील मार्मिक दाखला देऊन वादग्रस्त मुद्याचा समर्पकरीतीनें निकाल दिला. तो येणे प्रमाणें:—संस्थेचा व्यवहार व कारभार हा एक नाट्य प्रयोग आहे व तो प्रयोग चालविण्यास व पार पाडण्यास निरनिराळ्या दर्जाच्या नटांची आवश्यकता आहे. संस्थेचे डायरेक्टर हे या नाट्य प्रयोगांतील निरनिराळ्या दर्जाचे नट असें आपण कल्पूं. 'राम-रावण युद्ध' ही नाटिका चालू आहे.

नाट्यसंविधानकाप्रमाणें जाडजूड व भल्या अगडबंब नटाकडे रावणाची भूमिका आलेली आहे. म्हणून हा रावण जर रामापुढें नाटकाचे रंगभूमीवर आपली शक्ति व बळ याचें प्रदर्शन करूं लागेल तर प्रेक्षकांकडून त्याच्या प्रदर्शनाचा उपहासच होईल. रंगभूमीवरील "राम" हा कितीही किरकोळ व "रावण" कितीही लठ्ठ पुष्ट असेल, तरी रंगभूमीवरील खेळाचे वेळीं. त्यानें रामापुढें हतबल होऊन पडलेंच पाहिजे.

(१०) कै. साहेब काळे हे बँकेचे डायरेक्टर बोर्डावर असतांनाच ग्वाल्हेर संस्थानचे आर्थिक सल्लागार म्हणून त्यांची नेमणूक झाली व त्यानंतर ग्वाल्हेर संस्थानांतील सहकारी चळवळीची पुनर्घटना काय पद्धतीनें करावी या बाबत चौकशी करून रिपोर्ट करणेसाठी त्यांच्या एकट्याचीच योजना झाली. चौकशी पुरी होऊन त्यांनीं आपला सविस्तर रिपोर्ट संस्थानकडे दाखल केला. सदर रिपोर्टांत संस्थानी सहकारी संस्थांतील नोकर लोकांना सहकारी व्यवहाराचें शिक्षण देण्याची जरूर योजना भरभर खर्च सोसून देखील संस्थान सरकारनें हातीं घ्यावी अशी एक प्रमुख शिफारस होती. संस्थानचे अधिकारी मंडळींना ती इतकी निःसंकोचपणें मान्य झाली कीं, संस्थाननें सुमारे २० ते २५ हजार रु. खर्च करून आपल्या संस्थानांतील सुमारे ६० ते ७५ लोकांना पुणें येथें शिक्षणासाठी पाठवावें असें ठरविलें व त्याबाबत जरूर ती योजना करण्यास कै. दादासाहेब काळे यांनाच विनंति केली. कै. दादासाहेब यांनी शिक्षण क्रमाचा सर्व आराखडा तयार केला व व्याख्याते वगैरे नेमून जागेची, शिक्षण घेणाऱ्या मंडळींच्या रहाण्या–जेवण्याची वगैरे सर्व प्रकारची तजवीज करणेचे कामीं रा. सा. य. द. खोले यांची योजना केली. कै. दादासाहेब यांना रा. सा. खोले यांच्या कर्तृत्वाची यथायोग्य कल्पना स्पष्ट असल्यामुळें एकदां ती योजना त्यांना सविस्तरपणें सांगून त्यांचेकडे सुपूर्त केल्यानंतर त्यांनीं एकदर क्लासचें काम कसें काय चाललें आहे याबाबत (ते या शिक्षणक्रमाचे मुख्य-अध्वर्यु असतांही) रा. सा. खोले अगर इतर व्याख्याते मंडळी यांचेकडे एका अक्षरानेंही चौकशी केली नाहीं. मात्र आमचा हा वर्ग अगदी पद्धतशीरपणें उत्तम प्रकारें चालणार अशी त्यांना मनांत खात्री ठेवली होती व इतर चौकस मंडळींना ते तसेंच अभिमानानें सांगत. तसा तो वर्ग आदर्श झालाहि.

---

**चेक बुकांची आयात**—ज्या बँका परदेशी हुंडणावळीचा व्यवहार करीत असतील त्यांना चालू परवान्यांच्या मुदतीच्या काळांत त्यापूर्वी आयात करीत असलेल्या प्रमाणांत परदेशी चलनाचीं चेक बुकें, ड्राफ्ट फॉर्म्स आणि प्रवाशांचीं चेक बुकें आयात करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. डॉलर, सुलभ आणि दुर्लभ चलनाच्या सर्व देशांना ही सवलत लागू आहे.

**परराष्ट्रीय खात्यांतील स्त्रिया**—भारताच्या परराष्ट्रीय खात्यांत ३४ स्त्रिया काम करीत आहेत. त्यांपैकीं ५ विवाहित असून २९ अविवाहित आहेत. भारताच्या परदेशांतील वकिलातींतून एकूण ९३ स्त्रिया काम करीत आहेत. त्यांपैकीं ३६ विवाहित आणि ५७ अविवाहित आहेत. ९३ पैकीं ७५ स्त्रिया लंडनमधील हाय कमिशनरच्या कचेरींत नोकरी करीत आहेत.

**संयुक्त प्रांताचें विक्री कराचें उत्पन्न**—ता. १ एप्रिल, १९४९ पासून डिसेंबर १९४९ अखेर संयुक्त प्रांत सरकारला विक्री करापासून सुमारें ४ कोटी, २० लक्ष रुपये उत्पन्न झालें. मार्च १९५० अखेरपर्यंत ही रक्कम ६ कोटीपर्यंत गेली असावी असा अंदाज करण्यांत आला आहे.

## पुणें सें. को. बँकेच्या भोर शाखेचें उद्‌घाटन

### रा. ब. शेंबेकर ह्यांचें भाषण

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची आणखी एक शाखा जिल्ह्यांत विलीन झालेल्या भोर भागांतील शेतकऱ्यांच्या सोईसाठी चैत्र शु. प्रतिपदा (गुढी पाडवा) ता. १९ मार्च १९५० रोजीं भोर येथें बारामतीचे प्रसिद्ध शेतकरी रावबहादूर गणेश गोपाळ शेंबेकर यांचे हस्तें उघडण्यांत आली. बँकेचे चेअरमन श्री. ग. रा. तुळशीबागवाले यांच्या स्वागतपर भाषणानंतर भोर येथील प्रसिद्ध नागरिक नगरभूषण श्री. नानासाहेब थोपटे, श्री. क. अ. गुप्ते वकील व श्री. म. व्यं. शिंगरे यांनीं समयोचित भाषणें करून नवीन स्थापन होणाऱ्या शाखेचा भोर क्षेत्रांतील शेतकरी, व्यापारी वगैरे मंडळींना आतां विशेष उपयोग होईल, असें सांगून तिचा पूर्ण उपयोग त्यांनीं करून घ्यावा अशी त्यांस विनंति केली. रा. ब. दादासाहेब शेंबेकर यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत पाश्चात्य राष्ट्रांतील शेतकरी आपली शेती कशा प्रकारें करतात व निसर्गानें त्यांना उपलब्ध करून दिलेल्या साधनांचा ते यांत्रिक मदतीनें शेतीची वाढ करण्याचे दृष्टीनें कसा प्रयत्न करतात व ते आपली सांपत्तिक स्थिति सुधारतात हें अनेक उदाहरणें देऊन जमलेल्या शेतकऱ्यांना समजावून सांगितलें आणि पाश्चात्य शेतकऱ्यांचें अनुकरण भारतीय शेतकऱ्यांनीं करून राष्ट्राच्या संपत्तींत अधिक धान्य पिकवून त्यांनीं भर घालावी अशी त्यांना कळकळीची विनंती केली. शेवटीं जमलेल्या मंडळींचे बँकच्या भोर शाखा कमिटीचे अध्यक्ष श्री. ज. द. वैद्य यांनीं आभार मानले. भोर येथें एजंट म्हणून रा. शिवराम अनंत कुलकर्णी यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

---

### दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि., कोल्हापूर

वरील बँकेनें वृत्तांताचे वर्षी १,५०,६५२ रु. उत्पन्न मिळविलें. दिलेलें व्याज, पगार, व्यवस्थाखर्च, इत्यादि वजा जातां ३४,२११ रु. निव्वळ नफा उरला. त्यांतून ८,००० रु. रिझर्व्ह फंड, १६,४०० रु. कराची तरतूद, ३,५०० रु. इतर फंड, अशी वाटणी करून ऑर्डिनरी भागांस ६% डिव्हिडंड देण्यासाठी ६,१२४ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. बँकेचें वसूल भांडवल १,५३,६२५ रु. असून तिचेकडे २१,८१,५५७ रुपयांच्या ठेवी आहेत. ७,४०,५६८ रु. कॅश, १,२५,००० मनी अ‍ॅट कॉल, ३,१३,०६२ रु. इनव्हेस्टमेंट, १०,९३,५७५ रु. कर्जें, असे जिंदगीच्या बाजूचे प्रमुख आकडे आहेत. इनव्हेस्टमेंटची बाजारभावानें होणारी किंमत हिशेबांतील किंमतीपेक्षा ज्यास्त आहे. बँकेच्या काटकसरीच्या कारभाराची कल्पना नफा तोटा खात्यांतील तपशीलावरून सहज येते. (चेअरमनः सेठ चुनीलाल परमार. मॅनेजिंग डायरेक्टरः श्री. जी. जी. श्रीखंडे.)

---

### दि अष्टा अर्बन को. बँक लि., अष्टा (सातारा)

१९४७–४८ मध्यें ह्या बँकेस फक्त कर्जाची परवानगी होती. अहवालाचे वर्षी कॅश क्रेडिट, गोडाऊन बिझिनेस व सोनें तारण व्यवहार करण्याची परवानगी मिळाली. सरकारी कापड वाटप व धान्य रेशन हीं कामेंहि बँकेस मिळालीं, तीं तिनें उत्तम प्रकारें पार पाडलीं. बँकेचा ताळेबंद १,१७,६१६ रुपयांचा आहे. एकूण नफा १,४८० रु. उरला. ४% डिव्हिडंड देण्यांत आलें. बँकेच्या दुसऱ्याच वर्षी तिनें केलेली ही प्रगति अभिनंदनीय आहे. (चेअरमन : श्री. आनंदराव पांडुरंगराव भोपे. मॅ. डायरेक्टर : श्री. एन. ए. रुकडे. मॅनेजर : श्री. शं. म. पाटील.)

## दि मोर स्टेट बँक लिमिटेड

### बँकेचे चेअरमन, श्री. म. व्यं. शिंगरे, यांचें वार्षिक सभेंतील भाषण

( २६–३–१९५० )

आपल्या बँकेचें अगदीं सुरवातीचें भागाचें भांडवल रु. १,२५,००० होतें. तें पुढें सन १९४८ सालीं २,५०,००० रुपये झालें आणि विक्रीस काढलेले सर्व भाग वर्ताळा ( प्रीमिअम ) घेऊन खपले. यावरून आपल्या बँकेनें भागीदारांचा संपूर्णपणें विश्वास संपादन केला असें दिसून येईल.

आपल्या बँककडे सुरवातीस ठेवी रु. २,१०,००० च्या होत्या. त्यामध्यें वाढ होऊन त्या १६ लाखापर्यंत गेल्या. या ठेवीमध्यें भोर दरबारच्या मोठ्या ठेवी होत्या, हें आपणांस माहीत आहेच. भोर संस्थान मुंबई प्रांतांत विलीन झाल्यामुळें सरकारी नियमाप्रमाणें या ठेवी सरकारी ट्रेझरीकडे वर्ग कराव्या लागल्या तरीसुद्धां अहवालाचे सालीं सुमारें १० लाखांच्यापर्यंत ठेवी आपल्याकडे होत्या. आपल्या बँकेच्या रिझर्व व इतर फंडांत मिळून आज सुमारें ६९,६०० रुपये आहेत.

### नवीन बँकिंग ॲक्ट

भारत सरकारनें सन १९४९ सालीं बँकिंग ॲक्ट पसार केला असून त्यान्वयें आतां बँकांचे व्यवहारावर बरींच नियंत्रणें येणार असून रिझर्व बँकेमार्फत आतां सर्व बँकांची तपासणी होणार आहे. सरकार हल्लीं सर्व व्यवहारांवर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न करीत असून त्यामुळें जनतेची होणारी गैरसोय दूर करण्याचे मार्ग सरकारनें उपलब्ध करावेत असें मजप्रमाणें आपणा सर्वांस वाटत असेलच.

पुष्कळशा प्रांतांनीं सावकार नियंत्रण कायदे पास केले असून ते शेड्यूल्ड बँकांशिवाय इतर बँकांना लागू आहेत. सावकारी नियंत्रण कायद्यामुळें मध्यमवर्गीय जनतेची फारच अडचण होत असून त्यामुळें बँकांकडे कर्जमागणी फार मोठ्या प्रमाणावर आहे.

बँकिंग ॲक्ट हा हिंदुस्थानांतील बँका योग्य मार्गानें चालून ठेवीदारांचे हिताचे दृष्टीनें केला आहे असें मानण्यांत येतें. परंतु या नवीन कायद्यान्वयें रिझर्व्ह बँकेचें बरेंच मोठें नियंत्रण येणार असून आतां खरोखर शेड्यूल्ड व नॉन–शेड्यूल्ड बँका असा फरक करण्याचें कारण नाहीं, व अशा फरकामुळें मिळणाऱ्या सवलतीची विषमता आतां यापुढें असण्याचें कारण नाहीं असें वाटतें.

सरकारच्या अनिश्चित धोरणामुळें व आर्थिक व्यवस्था पाहणाऱ्या व करणाऱ्या संस्था यावरील बंधनामुळें व्यापारउद्योग यांना भांडवल–पुरवठा अपुरा पडेल असें वाटतें. मध्यवर्ति सरकारनें जरी उद्योगधंद्यास पैसे पुरविणारी संस्था अस्तित्वांत आणली व त्याचें अनुकरण इतर कांहीं प्रांतांनीं केलें तरीसुद्धां हे प्रयत्न अपुरे पडतात. या दृष्टीनें लोकादरास पात्र झालेल्या बँकांनींच हा व्यवहार करणें योग्य असल्यानें बँकिंग व्यवहारावरील नियंत्रण फार कडक असूं नये असें वाटतें. शिवाय अशा बँकांना नियंत्रणाबरोबरच समाज व राष्ट्रीय उत्पादनाचे कामीं सहाय्य करतां यावें म्हणून त्यांना भांडवल–पुरवठा करण्याची जबाबदारी रिझर्व बँकासारख्या बँकांनीं घेणें युक्त आहे असं वाटतें.

### लांब मुदतीच्या कर्जाची व्यवस्था.

आज असें दिसून येईल कीं, उद्योगधंदे व राहणी सुधारण्यासाठीं लांब मुदतीचीं कर्जें देण्याची व्यवस्था समाधानकारक नसल्यामुळें उत्पादनांत खिळ पडूं लागत असून बँकाव्यतिरिक्त व्यक्तींकडून थोड्याशा जास्त व्याजानें ठेवी उद्योगधंद्यासाठीं घेतल्या जातात व त्यामुळें पुष्कळशा वेळेस ठेवीदार पश्चात्ताप पावल्यासारखे दाखवितात. आमच्या मतें मध्यम व लांब मुदतीचीं कर्जें देणाऱ्या स्वतंत्र संस्था अस्तित्वांत येणें जरूर आहे. सावकारी नियंत्रण कायद्यामुळें खाजगी व्यक्तीकडून कर्ज मिळणें कठीण जाऊं लागलें आहे. यासाठीं एक तर सहकारी संस्था काढून त्यामार्फत त्याची सोय करावी लागेल अगर नवीन अशा कर्ज देणाऱ्या व्यक्तींची एक संस्था काढून त्यामार्फत व्यवहार करावा लागेल

आपल्या बँकेनें विलीन संस्थानांतील बँकांच्या अडचणींचा विचार करून त्या सोडविण्याचेबाबत बरेच प्रयत्न केल्याचें माहीत असेलच, याबाबत सरकारबरोबर अद्याप पत्रव्यवहार चालूं असून सरकारी निर्णय व्हावयाचा आहे.

---

### अखिल–भारतीय सहकारी परिषद

इंडिअन–कोऑपरेटिव्ह युनिअन ह्या संस्थेतर्फे दिल्ली येथें अ. भा. सहकारी परिषद भरली होती. परिषदेच्या अध्यक्ष श्री. कमलादेवी चट्टोपाध्याय ह्या होत्या, आणि भारतांतील बऱ्याच राज्यांचे प्रतिनिधी परिषदेला उपस्थित राहिले होते.

परिषदेनें मंजूर केलेले ठराव भारतांतील सध्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता मार्गदर्शक ठरण्यासारखे आहेत. त्यांतल्या त्यांत, ज्यांच्या किंमती नियंत्रित करण्यांत आलेल्या आहेत, अशा वस्तूंबद्दलचा परिषदेचा ठराव महत्त्वाचा आहे. ह्या ठरावांत भारतीय सरकारला अशी विनंति करण्यांत आली आहे कीं नियंत्रित सर्व वस्तूंचें वांटप सहकारी संस्थांमार्फतच करण्यांत यावें. असें केल्यानें काळ्या बाजाराची इतिश्री होईल आणि वस्तूंचें वांटप समानतेच्या तत्त्वाला धरून होईल. सहकारी प्रयत्नानें उत्पादन करणाऱ्या संस्थांना सरकारनें नियंत्रित वस्तूंचा कच्चा माल भरपूर पुरवावा अशीही मागणी परिषदेनें केली आहे. सहकारी शेतीला सरकारनें अधिक उत्तेजन द्यावें अशी मागणी एका ठरावान्वयें करण्यांत आलेली आहे. अशा संस्थांना यांत्रिक नांगरणीचे कमी दर व पडिक जमीन लागवडीस आणण्याबद्दल कमी सारा द्यावा अशा सूचना परिषदेनें केल्या आहे. भारतांतील सहकारी चळवळीसंबंधीं परिषदेनें केलेल्या ठरावाचा आशय पुढीलप्रमाणें आहे. भारतांतील सहकारी चळवळीची प्रगति फारशी समाधानकारक नाहीं. बऱ्याच सहकारी संस्था संघटना, तांत्रिक कार्यक्षमता आणि आर्थिक बळ ह्या दृष्टीनीं कमकुवत आहेत. सहकारी संस्थांचा प्रकार पतपेढ्या पुरताच बहुतेक मर्यादित राहिला आहे. लोकांनाही सहकारी संस्थांच्या फायद्याची माहिती नाहीं. शिवाय निरनिराळ्या सहकारी संस्थांना सूत्रबद्ध करणारी अशी मध्यवर्ती संघटनाहि नाहीं. सहकारी संस्थांच्या कार्यांत सूत्रबद्धता आणण्यासाठीं काय करावें, ह्याचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत यावी.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## दि सांगली बँक लि., सांगली

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ३,००,००० | कॅश | १३,८०,१६३ |
| फंड | ३,५५,०३२ | इनव्हेस्टमेंटस | २५,४६,०४९ |
| ठेवी | ७२,८६,११४ | कर्जे | ४४,७०,६६४ |
| नफा | ९३,३६६ | इमारत, इ | ३,२०,५३२ |

वरील आंकड्यांवरून सांगली बँक लि. च्या १९४९ अखेरच्या उत्कृष्ट परिस्थितीची कल्पना येईल. बँकेचें वसूल भांडवल ५ लाख रु. नसतांनाहि रिझर्व्ह फंडाच्या व व्यवहारांच्या मजबुतीवर ही बँक शेड्यूल्ड बँक झालेली आहे, हें तिचें वैशिष्ट्य आहे. इनव्हेस्टमेंटची किंमत हिशेबांत दिसत आहे, तिच्यापेक्षां बाजारभावानें ती अधिक भरत आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ९३,३६६ रु. नफा झाला. ११½% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ३६,७५१ रु. लागले. ५४,००० रुपये रिझर्व्ह फंड, चॅरिटि फंड, टॅक्सेशन रिझर्व्ह, कॉंटिन्जन्ट फंड, इत्यादींत टाकण्यांत आले. अहवालाचे वर्षी रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनें तुपारी शाखेचें कराड येथें स्थलांतर करण्यांत आलें. बँकेचे मॅनेजर श्री. पी. एस. मोकाशी, बी. ए. ह्यांची रिझर्व्ह बँकेंत डेप्युटी चीफ ऑफिसर म्हणून नुकतीच नेमणूक झाली आहे, ही गोष्ट बँकेस व श्री. मोकाशी ह्यांस, दोघांसहि भूषणावह आहे. ( चेअरमन : श्री. एच. बी. कुलकर्णी, बी. ए.; मॅनेजर : श्री. पी. एस. मोकाशी, बी. ए. अकौंटंट : श्री. शं. ल. गावडे. )

---

### प्राप्तीवरील कराचें एकूण करवसुलींत स्थान

भारतांतील सुमारें फक्त ६ लक्ष लोक इनकमटॅक्स भरतात. म्हणजे, त्यांचें एकूण लोकसंख्येशीं प्रमाण ०·२५% पडतें. बाकीचे ९९·७५% लोक हा कर देत नाहींत. भारतांतील एकूण करवसुलीत ह्या कराचें प्रमाण सुमारें ४५% पडतें.

---

### "विवेक" वर्षप्रतिपदा अंक, शके १८७२

वरील अंक "विवेका"च्या परंपरेस धरून निघाला आहे. सामान्य वाचकाच्या सुप्त व प्रकट सदभिरुचीस व लोकशाही प्रेमास पटणारें वाङ्मय पुरवून यथार्थनाम रहाण्याचा "विवेका"चा सतत प्रयत्न असतो. विवेकें क्रिया करण्याचें अगत्य सुबुद्ध वाचकांस माहीत आहेच. त्यांना क्रियाप्रवण करण्याचें महत्त्वाचें काम "विवेक" करीत आहे. प्रस्तुत विशेषांकाचें अंतरंग व बहिरंग त्याच्या ध्येयास अनुसरूनच आहे. ( संपादक: व. के. दावतर. वा. व. ६॥ रु. मुंबई २. )

---

**आधुनिक शेतीची आवश्यकता**—हिंदुस्थानांत शेतीची आधुनिक अवजारें वापरून उत्पादन वाढविण्याची फार जरूरी आहे असें मत कॅनडाच्या एका मंत्र्यांनीं व्यक्त केलें आहे. उलटपक्षीं, सीलोनमध्यें यांत्रिक नांगरापेक्षां पाणी उपसणाऱ्या पंपांची अधिक जरूर आहे असें त्यांचें म्हणणें आहे.

**युरोपमधील राष्ट्रें ब्रिटनवर नाखूष?**—फ्रँकफर्ट ( जर्मनी ) मधील एका मासिकांत डॉ. ॲशॉगेन ह्यांनीं एक लेख लिहून युरोपमधील राष्ट्रें ब्रिटनवर आज फार नाखूष असल्याचें प्रतिपादिलें आहे. जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन, स्वीडन, नॉर्वे व डेन्मार्क ह्या सर्व देशांच्या नाराजीचीं कारणें लेखांत दाखविण्यांत आलीं आहेत आणि ब्रिटन युरोपमधून माघार घेऊन ब्रिटिश राष्ट्रसंघ आणि अमेरिका ह्यांच्यावर तो अधिक अवलंबून रहात आहे असा निष्कर्ष काढला आहे.





धी बँक ऑफ
सिटिझन्स लि.

स्थापना १९३७

मुख्य कचेरी: १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.
शाखा: बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | ७,००,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ३,४७,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. |
| खेळतें भांडवल | ३६,००,००० रु. |

जनरल मॅनेजर
बँक ऑफ सिटिझन्स लि.
बेळगांव.








हें पत्र पुणें, पेठ मांचुर्डा घ. नं. ११५११ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.